# लोकांची सेवा करणे हेच लोकप्रशासनाचे कर्तव्य-कुलगुरू डॉ. उद्धव भोसले

देगलूर -अलीकडच्या काळात देशाच्या सर्वांगीण विकासात लोकप्रशासनाच्या भूमिकेला सर्वाधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. लोकप्रशासनातील प्रत्येक अधिकारी व कर्मचारी हा लोकसेवक असून त्याने आपले लोकसेवेचे कर्तव्य प्रामाणिकपने पार पाडले पाहिजे. लोकप्रशासनात शिस्त, कार्यक्षमता, उतरदायित्व व कार्यसंस्कृती विकसित होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन रा.ती.म.विद्यापीठ नांदेडचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांनी केले. ते नांदेड विद्यापीठ व आडत व्यापारी शिक्षण संस्था संचालित देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने बी. ए. तृतीय वर्ष लोकप्रशासन विषयाच्या नवीन अभ्यासक्रमावर ऑनलाईन कार्यशाळा उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर होते. या कार्यशाळेत बी. ए. तृतीय वर्षाच्या नवीन अभ्यास-क्रमावर लोकप्रशासन अभ्यास मंडळ व विद्यापीठ कार्यक्षेत्रातील प्राध्यापक यांच्यामध्ये दिवसभर विचारमंथन करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे विद्यापीठाच्या मानव्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पंचशील एकम्बेकर, लोकप्रशासन अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. यू. एल. इंगळे, अ. व्या. शिक्षण संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार, सुशीलादेवी देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय पाटील, देगलूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी. चिद्रावार उपस्थित होते.

प्रस्तुत कार्यशाळेत साधन व्यक्ती म्हणून विद्यापीठातील लोकप्रशासन अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. अशोक सोनकांबळे, डॉ. संतराम मुंडे, डॉ. मीरा फड, डॉ. अशोक जाधव, डॉ. बी. आर. कतुरवार, विद्यार्थी प्रतिनिधी मनीषा वनंजे यांनी साधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन केले.

अभ्यास मंडळ व लोकप्रशासन विषय अध्यापन करणारे प्राध्यापक यांच्यात विविध विषयांवर चर्चा व विचारमंथन करण्यात आले. याकार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यशाळा समन्वयक लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ. बी. आर. कतुरवार यांनी केले तर आभार सहसमन्वयक डॉ. एस. एम. देबडे यांनी मानले.

Scanned with CamScanner